**फौजदारी किरकोळ अर्ज क्र.४४३/२०२३**

पुजा पवन सरोदे

**विरुद्ध**

पवन भागचंद सरोदे आणि इतर

## निशाणी क्र.५ खालील आदेश

प्रस्तुतचा अर्ज अर्जदाराने महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासुन संरक्षण अधिनियम २००५ अंतरिम पोटगी मिळणेसाठी अर्जदाराने अर्ज दाखल केला आहे.

२. अर्ज व त्यावरती दाखल केलेल्या लेखी म्हणणे याचे अवलोकन केले. अर्जदार यांच्या विद्वान वकिलांचा युक्तीवाद ऐकला. गैरअर्जदार याने लेखी युक्तीवाद दाखल केलेला आहे. अर्ज सुनावणीसाठी घेवुन अर्जदाराच्या विनंतीनुसार आदेशाकरीता ठेवला.

३. प्रस्तुतचा अर्ज निकाली काढते वेळी खालील मुद्दे माझे विचारार्थ उपस्थित होतात.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदारवर गैरअर्जदारांनी कौंटुबिक हिंसाचार केला हे प्रथमदर्शनी सिध्द केले आहे का ? | होकारार्थी. |
| २ | अर्जदार ही कौंटुबिक हिंसाचार कायदा कलम २३ नुसार गैरअर्जदारकडून दरमहा किती रुपये | दरमहा रु.५,०००/– |

| | | |
|---|---|---|
| | अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र ठरते काय ? | |
| ३. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ व २ करीता–**

४. अर्जदाराने अर्जातील कथनांना पुष्टी देण्यासाठी स्वतःचे प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे तसेच उत्पन्नाबाबत शपथपत्र् देखील दाखल केलेले आहे. गैरअर्जदाराने या अर्जास दाखल केलेल्या जबाबाव्यतिरिक्त कोणतेही दस्ताऐवज अथवा तोंडी व कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही.

५. अर्जदाराचे थोडक्यात कथन असे की, अर्जदार व गैरअर्जदार क्र. १ यांचा विवाह त्यांचे धर्म रितिरीवाजाप्रमाणे दि. २८/०६/२०२३ रोजी विरगाव फाटा येथे साखरकिसा मंगल कार्यालय येथे अर्जदाराचे घरचे लोकांनी अत्यंत थाटामाटात व लग्नात सर्व जिवनावश्यक त्या वस्तु देवुन लावुन दिले. तसेच सदरचे लग्न संबंधातुन अर्जदार व गैरअर्जदार क्र. १ यांना कोणतेही अपत्ये झालेले नाही. सदरचे लग्नसंबंध आजपर्यंत कायम आहेत.

६. लग्न संबंधाप्रमाणे अर्जदर हिचा गैरअर्जार क्र. १ हा पती असुन,

गैरअर्जदार क्र. २ व ३ सासु सासरे असनु, गैरअर्जदार क्र. ४ ननंद, गैरअर्जदार क्र. ५ दिर असे नातेसंबंध आहेत.

७. अर्जदार हिचे वडिल नसल्याने ती आईसोबत गुजरात येथे वास्तव्यास होती एप्रील २०२३ मध्ये तिचे मुळ गावी चिंचडगाव येथे आणुन गैरअर्जदार क्र. १ सोबत तीचे लग्न लावुन दिलेले आहे.

८. लग्न झाल्यानंतर रुढी परंपरेप्रमाणे अर्जदार हि नांदण्यास गैरअर्जदार यांचे एकत्रीत कुटुंबात नांदण्यास गेली. तेथे गैरअर्जदार यांनी तीला सुरुवातील ८ ते १० दिवस बरे नांदविले व नंतर तिचेवर कौटुंबीक हिंसाचार करण्यास सुरुवात केली व गैरअर्जदार क्र. १ हा म्हणु लागला की, तु परराज्याची आहे, तुला जर आमच्याकडे नांदायचे असेल तर तुझ्या माहेराहुन आम्हाला घर बांधण्यासाठी ५ लाख रुपये घेवुन ये, नसता आम्ही तुला नांदविणार नाही असे म्हणुन दररोज शिवीगाळ करुन लागला. गैरअर्जदार क्र. २ व ४ हे तीला म्हणाले की, तुझ्या घरचे लोकांनी सदरचे लग्न आमचे ऐपतीप्रमाणे केले नाही व आम्हाला मनासारखा हुंडा देखील दिला नाही, तु आमची मागणी पुर्ण केली नाहि तर आम्ही तुला नांदविणार नाही असे म्हणुन तिच्याकडुन पुरुष गड्यासारखे दिवस–दिवसभर घरातील सर्व कामे करुन घेत असे व दुस–या लोकांसमोर तिचा अपमाण होईल अशी वागणुक तिला देत असे. तसेच तिला दिवस भर उपाशीपोटी देखील ठेवीत असे. गैरअर्जदार क्र. ४

हि अर्जदारास म्हणत असत की, हि आपल्या लायकिची नाहि हिला घरातुन हाकलु टाका असे म्हणुन शिवीगाळ करत असे. गैरअर्जदार क्र. ५ हा कायम अरेरावीची भाषा अर्जदारास करीत असत. अशा प्रकारे सर्व गैरअर्जदार क्र. १ ते ५ यांनी अर्जदार हिच्यावन मानसिक, शरिरिक व कौटुंबीक हिंसाचार दररोज करत असत.

९. अर्जदार गैरअर्जदारांस समजावुन सांगत असे की, माझे वडील मयत आहे आईने माझे कसेबसे पालन पोषण केलेले असुन लग्नांत सर्व पैसे तुम्हाला देवुन सांगितल्याप्रमाणे लग्न केले आहे आणि आता त्यांच्याकडे पैसे नाहित असे म्हणटल्यावर गैरअर्जदार क्र. १ ते ५ हे अर्जदारास बेदम मारहाण करीत असे.

१०. गैरअर्जदार यांचे वागण्यात आज ना उद्या फरक पडेल म्हणुन अर्जदार हि तेथेच नांदत राहिती. परंतु अर्जदारास हि रक्कमेची व्यवस्था करत नाही व फारकतही देखील देत नाहि म्हणुन गैरअर्जदार तिच्यावर जास्त प्रमाणात तिच्यावर कौटुंबीक हिंसाचार करु लागले.

११. दि. २६/१०/२०२३ रोजी अर्जदार तिच्या आत्याकडुन सासरी परत आली आणि घरात गेली असता गैरअर्जदार क्र. १ योने मागुन येवुन तिचे केस धरुन तिला जोरात भिंतीवर आपटले. त्यामुळे अर्जदार हिस चक्कर आल्याने ती खाली पडली असता, गैरअर्जदार म्हणाले की, तु तुण्या आत्याकडे कशाला गेली असे म्हणुन सर्व गैरअर्जदार यांनी मिळुन अर्जदार हिला पोटात व पाठीवर लाथा बुक्क्याने

बेदम मारहाण केली व अर्जदार हिच्या अंगावरील सर्व दाग दागिने काढुन घेतले व तिला म्हणाले की, तु जोपर्यंत ५ लाख रुपयेची व्यवस्था करीत नाही तोपर्यंत आम्ही तुला नांदविणार नाही असे म्हणुन तिला अंगावरील वस्त्रानीशी घरातुन काढुन दिले.

१२. अर्जदार हिने गैरअर्जदाराविरुन पोलीस स्टेशन मुकुंदवाडी औरंगाबाद येथे एन.सी.नं. १६३७/२०२३ कलम ३२३, ५०४, ५०६ व ३४ भा.द.वी. प्रमाणे नोंद केलेली असुन नंतर ती उपचारासाठी घाटी रुग्णालय औरंगाबाद येथे गेली व नंतर माहेरी चिंचडगाव येथे आली व तेव्हापासुन अर्जदार हि तिचे माहेरी राहत आहे. अर्जदाराच्या नातेवाईकांना गैअर्जदारांना फोन करुन तिला नांदवण्यासाठी विनंती केली असता गैरअर्जदार ५ लाख रुपयांची व्यवस्था केली तरच नांदवु असे म्हणाले. व अर्जदार हिला त्यांच्याकडे घेवुन आले तर तिला मारुन टाकु अशी धमकी दिली.

१३. अर्जदाराने पुढे असे कथन केलेले आहे की, तिच्यावर झालेल्या कौटुंबीक हिंसाचारामुळे ती खचुन गेलेली असन तीच्याकडुन कोणताही कामधंदा होत नाही व ती स्वतःचा उदनिर्वाह करण्यास असमर्थ आहे. तसेच अर्जदाराचे वडील मयत आहेत. अर्जदार हिला उत्त्पन्नाचे कोणतेही साधन नाही. गैरअर्जदार हा धडधाकट असुन कमावता व्यक्ती आहे व तो रिलायन्स मॉलमध्ये नोकरीस आहे व त्यास दरमहा ३० ते ३५ हजार रुपये पगार मिळतो. तसेच तो इतर व्यवसाय देखील करतो त्यापासुन त्याला वेगळे उत्पन्न मिळते. तसेच त्याचे स्वतःचे घर देखील आहे.

गैरअर्जदार याचेवर अर्जदाराशिवाय इतर कोणतीही जबाबदारी नाहि व तो सहज अर्जदार हिच्या मागण्या पुर्ण करु शकतो. अर्जदार हिला दरमहा १०,०००/– रुपये खर्च येतो त्यामुळे अर्जदार हिला दरमहा १०,०००/– गैरअर्जदार याचेकडुन मिळण्यासाठी अर्जदाराने विनंती केलेली आहे.

१४. गैरअर्जदार लेखी म्हणण्यामध्ये कथन करतात की, अर्जदाराने प्रस्तुत अर्ज संपुर्णपणे खोटा आणि काल्पनीक गोष्टी करुन रचलेला आहे. गैरअर्जदारास अर्जदाराच्या आजाराची पार्श्वभुमी माहित असल्यामुळे त्याने लग्नाबद्दल कोणताही आक्षेप घेतलेला नव्हता. गैरअर्जदाराने कधीही पैशाची मागणी केलेली नाही याउलट तिला माहेरी जातांना आवश्यक पैसे दिलेले होते. अर्जदार घरकामे करण्यामध्ये उत्सुक नव्हती. ती फक्त नवरा म्हणुन गैरअर्जदार क्र. १ ची कामे करत असे आणि इतर गैरअर्जदारांनी काहीही सुचना करुन नये असे म्हणत असे. त्यांच्याकरता अन्न शिजवत नसे आणि घरातील इतर कामे देखील करत नसे. त्यांच्याकरता पिण्यासाठी पाणी देत नसे. अर्जदाराने ब–याचवेळा राज्याबाहेर फिरायला जाण्याची मागणी केली आणि दागदागीने खरेदी करा असे सांगत असे. अर्जदाराच्या मागण्या पुर्ण न केल्यास ती गैरअर्जदार क्र. १ यास बिनकामाचा मानुस आहे असे म्हणुन तिच्या इतर नातेवाईकांची आणि मीत्रांची उदाहरणे महागडी भेटवस्तु खरेदी करावी म्हणुन देत असे.

१५. गैरअर्जदार क्र. १ आर्थिकदृष्ट्या खुप मागासलेला असुन तात्पुत्या स्वरुपात कंपनीमध्ये कामाला आहे आणि त्याच्या तुटपुंज्या उत्पन्नातुन उदनिर्वाह भागवतो. गैरअर्जदार क्र. १ चे उत्तपन्न कमी असल्यामुळे तो अर्जदाराच्या गरजा भागवु शकत नाही. गैरअर्जदार क्र. १ ने कधीही तिच्याकडे घटस्फोट मागीतलेला नाही. घटस्फोटाची मागणी पुर्णपणे खोटी आहे. गैरअर्जदार क्र. १ सदहेतुने त्याचे वैवाहीक कर्तव्य बजावण्यास तयार असतो परंतु अर्जदार त्यास सहकार्य करत नाही. अर्जदाराने अनेकवेळा एकत्र् न राहण्याबद्दल भांडणे केलेली आहे. तिने अर्वाच्य आणि गलीच्छ भाषेमध्ये गैअर्जदार क्र. ४ यांच्याविरुद्ध आरोपी करुन शिव्या दिलेल्या आहेत. अर्जदार म्हणत असे की, तिच्या सासु गैरअर्जदार क्र.४ हिल्या त्याच्यासोबत राहण्याचा अधिकार नाही आणि तिने पुन्हा लग्न करावे. भांडण चालु असतांना गैरअर्जदार क्र. ३ हिने ते सोडवीण्याचा प्रयत्न केल्या तेव्हा तीला अर्जदारामुळे दुखापत झाली अशा प्रकारे अर्जदार गैरअर्जदारांना नेहमी त्रास देते.

१६. अर्जदार गैरअर्जदार क्र. १ यास त्याने वेगेळे राहावे म्हणुन त्यास एकसारखी मागणी करते. परंतु, अत्यल्प उत्पन्न असल्यामुळे तिची हि मागणी पुर्ण होवु शकत नाही. अर्जदार त्यामुळै स्वतःहुन गैरअर्जदारापासुन वेगळी राहते. गैरअर्जदार क्र. १ अर्जदाराच्या फोनला हात लावू शकत नाही. फोन लावल्यास अर्जदार भांडण करते. अर्जदार गैरअर्जदार क्र. ३ आणि ४ यांच्याकरिता चहा आणि

नाष्टा बनवत नाही. तिला तसे करण्यास सांगितल्यास ती हाणमार चालु करते. अशी घटना घडल्यानंतर ती स्वतःहुन पोलीस स्टेशनला जाते आणि तक्रार करते आणि माहेरी निघुन जाते. गैरअर्जारांनी अनेकवेळा तिला मागारी आणण्याचा प्रयत्न केलेला आहे परंतु तो निष्फळ ठरला आहे. अर्जदाराचा अर्ज नामंजुर करण्यात यावा.

१७. प्रस्तुत अर्जाच्या सुनावणीकामी कौटुंबीक हिंसाचार कायद्याअंर्तगत अर्जदाराला तिचे कथन केवळ प्रथमदर्शनी पुराव्याआधारे बरोबर असल्याचे शपथपत्र दाखल करुन सिद्ध करायचे आहे तर याउलट गैरअर्जदाराला त्याचे कथन संशयापलीकडे सिद्ध करायचे आहे. दोघांवर त्यांची कथने सिद्ध करण्याचा भार वेगवेगळा आहे. या अर्जाच्या सुनावणीकामी अर्जदाराने अर्जासोबत शपथपत्र दाखल केलेले आहे परंतु गैरअर्जदाराने पुरावा दिलेला नाही. लेखी म्हणणे दाखल केलयानंतर त्याने लगेचच लेखी युक्तीवाद दाखल केलेला आहे त्यामुळे या अर्जाच्या सुनावणीकामी आदेश देणे योग्य होईल असे दिसुन येते.

१८. अर्जदार तिचे स्वतःचे पालनपोषन करु शकत नाही तर गैरअर्जदार स्वतःहुन कंपनीमध्ये नोकरी करत आहे असे कथन करतो यावरुन तो स्वतःचे आणि कुटुंबाचे पालन पोषण करु शकतो असे दिसुन येते. मुळ अर्जाचा निकाल लागण्यासाठी बराचसा कालावधी जाणार आहे. प्रस्तुत अर्ज मागील दोन वर्षांपासुन

प्रलंबीत आहे. तात्पुरत्या पोटगीची सोय करणे आवश्यक आहे कारण अर्जदार हिस वेळोवेळी प्रकरणाच्या चौकशीसाठी न्यायालयात हजर रहावे लागणार आहे. तिला वकील फी व जाणे–येण्याचा खर्च सोसावा लागेल, तसेच दरम्यानच्या काळात तिला तिच्या आई–वडिलांच्या आश्रयाने जीवन व्यतीत करावे लागणार आहे. अर्जदारला तिचे स्वतःचे उत्पन्नाचे साधन नाही. अर्जदारच्या पालनपोषणाची जबाबदारी गैरअर्जदाराची आहे. त्यामुळे अर्जदार ही गैरअर्जदारांकडुन अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र आहे.

१९. सध्याची महागाई, अर्जदार व गैरअर्जदार यांच्या राहणीमानाच्या दर्जाचा विचार करता गैरअर्जदाराने अर्जदारच्या सर्व खर्चासाठी अर्जदार क्र.१ हिला प्रति महिना ५,०००/– रुपये अंतरिम पोटगी अर्जदारला दिल्यास न्यायसंगत होईल करीता मी मुद्दा क्र.१ चे उत्तर होकारार्थी देवुन मुद्दा क्र. २ करीता तात्पुर्ती पोटगी रुपये ५०००/– ठरविण्यात येत आहे.

**मुद्दा क्र.३ करीता–**

२०. मुद्दा क्र.१ व २ च्या उत्तरादाखल अर्जदार ही गैरअर्जदारकडून अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र ठरलेली आहे. सबब, मी मुद्दा क्र.३ चे उत्तरादाखल पुढील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२. गैरअर्जदाराने अर्जदार हिस दि.३०.१०.२०२३ पासून दरमहा ५,०००/– रुपये (अक्षरी पाच हजार रुपये मात्र) तात्पुर्ती पोटगी देण्यात यावी.

३. या आदेशाची प्रमाणीत प्रत उभय पक्षकारांना मोफत देण्यात दयावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by PISAL DHANANJAY SHRIRAM
Date: 2025.04.02 17:13:18 +0530

दिनांक– ०२.०४.२०२५ डी. एस. पिसाळ

वैजापूर. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, वैजापूर.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | Swapnil B. Jadhav<br>Stenographer Grade-III, |
| Court | : | D. S. Pisal<br>Judicial Magistrate First Class,<br>Vaijapur,<br>Dist. Aurangabad. |
| Date of order | : | 02.04.2025 |
| Order signed by the presiding officer on | : | 02.04.2025 |
| Order uploaded on | : | 02.04.2025 |